**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी</u> -**

मी याद्वारे शपथेवर सांगते की - माझे नांव - शुभांगी आत्माराम जाधव, वय अंदाजे ५० वर्षे , धंदा - घरकाम, रा. कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

**<u>फिर्यादीतर्फे श्री. अमित सावंत, वकील</u> -**

**१.** मी कुडाळ येथे राहते. मी कोर्टात हजर आरोपी संतोष जगन्नाथ जाधव यास ओळखते. तो माझा नात्याने भाचा लागतो. आरोपी व आमचे दरम्यान जमिनीवरुन वाद आहेत. दि. १८ जुलै २०१५ रोजी तो आमच्या जमिनीत आला, तेथे आमचा संडास आहे. त्याने त्या संडासाचे भांडे फोडले. आवाज आल्यावर मी तिकडे गेले व त्याला जावून विचारले की, तू हे काय करतोस, आमचे नूकसान झाले.

**२.** त्याने त्यावर माझे केस धरले व थापटाने मारहाण केली, तसेच अश्लिल भाषेत शिवीगाळ केली व म्हटले की, रांडेच्या, भोसडीच्या तू काय समजतेस? त्यावेळी तेथे माझी सून अनुष्का अभय जाधव आणि पती आत्माराम यशवंत जाधव, हे सुध्दा हजर होते. त्यानंतर आम्ही तिघेजण कुडाळ पोलीस स्टेशनला गेलो व घटनेची माहिती दिली. पोलीसांनी त्याबाबत लिहून घेतले व अदखलपात्र गुन्हा दाखल केला. त्याबाबत मला लेखी समज दिली. *आता मला पोलीसांनी मला दिलेली ती लेखी समज दाखविली.* त्यातील मजकूर मी सांगितल्याप्रमाणेच लिहिलेला आहे. तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे, तो मी ओळखते. ती समज **<u>निशाणी २४</u>** वर आहे.

**३.** पोलीसांनी कोणतीही कारवाई केली नाही, म्हणून आरोपी विरुध्द सदरची फिर्याद दाखल केली. कोर्टात हजर आरोपी ज्याने मला मारहाण केली तो तोच आहे.

**<u>आरोपी तर्फे उलटतपास, आरोपी स्वतः</u> -**

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपीने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मीच पोलीसांना बोलावले व आरोपीवर हल्ला केला आणि त्याबाबत वैद्यकीय तपासणी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आमचे दरम्यान घराबाबत वाद सुरु असल्याने खोटी फिर्याद दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>फेरतपास</u>** - नाही.

समक्ष - सही/-

**कुडाळ,** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : ०६ /०७ /२०१७** **प्र.श्रे. न्यायदंडाधिकारी, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**

वा.दा.ब.अ.क.केले.

सही/-

**कुडाळ,** **(कोमलसिंग राजपूत)**

**दिनांक : ०६ /०७ /२०१७** **प्र.श्रे. न्यायदंडाधिकारी, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग**